वाचा :- १. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ३४, दि. २६.०२.२००१
२. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ६२, दि. २७.०४.२००१

स्था.१८/ब/ लेखा आक्षेप अनुपालन /वलेप अहवाल/न.क्र.१८३/

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,**
**कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४**

**स्थायी आदेश क्र.११ /२०१७, दिनांक** 14 JUN 2017

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण पुर्नविलोकन अहवालात समाविष्ट नसलेल्या लेखाआक्षेपांच्या (Non PRC Paras) अनुपालन पडताळणीबाबत.

प्रस्तावना:-

उपरोक्त वाचामधील आदेश क्र. ०१ अन्वये स्थानिक निधी लेखापरीक्षा आक्षेपांची अनुपालन पडताळणी करण्यापुर्वी विभागीय सह संचालक, जिल्हा सहाय्यक संचालक अथवा लेखापरीक्षा अधिकारी यांनी जर संबंधित विभागातील अथवा जिल्हयातील जिल्हा परीषदेत यापुर्वी काम केले असेल तर त्यांनी त्या कालावधीतील लेखापरीक्षा आक्षेपांचे अनुपालन पडताळणीपुर्वी संचालनालयास सुचना देणे तसेच वाचामधील आदेश क्र. ०२ अन्वये स्थानिक निधी लेखापरीक्षा आक्षेपांचे अनुपालन पडताळणीसाठी प्राप्त होणारे प्रस्ताव जर अनुपालन पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याने पुर्वी त्याच संस्थेत केलेल्या सेवेच्या कालावधीतील असतील तर अशा प्रस्तावांची अनुपालन पडताळणी त्या अधिकाऱ्याने करु नये व अशा प्रस्तावांच्या अनुपालन पडताळणीचे काम त्या अधिकाऱ्यापेक्षा वरीष्ठ असणाऱ्या व संचालकांनी आदेशित केलेल्या अधिकाऱ्यानेच करावे. जेथे असा अधिकारी सहाय्यक संचालक दर्जाचा असेल तेथे अनुपालन पडताळणीचे काम विभागीय सह संचालक यांनी करावे. जेथे असा अधिकारी सह संचालक असेल, त्यांचे बाबतीत अनुपालन पडताळणीचे काम इतर विभागातील सह संचालक आपसात वाटून घेतील असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदरचे वाचामधील आदेश निष्कासित करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

आदेश:-

स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषदा, महानगरपालिका) व संकीर्ण संस्थांकडील पुर्वी सेवेत असलेले महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील अधिकारी ( सहाय्यक लेखाधिकारी, लेखाधिकारी, सहाय्यक संचालक, उपसंचालक, सह संचालक ) यांची बदली अथवा पदोन्नतीने नेमणुक स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागात होत असल्याने त्यांनी उपरोक्त संस्थेत केलेल्या सेवेच्या कालावधीतील स्थानिक निधी लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालात

समाविष्ट नसलेल्या लेखा आक्षेपांची (Non PRC Paras) अनुपालन पडताळणी करणे तात्वीकदृष्टया योग्य नाही. अशा लेखाआक्षेपांच्या अनुपालन पडताळणी खालील निर्देशित केलेल्या अधिकाऱ्याने करावी.

१. जिल्हा सहाय्यक संचालक, विभागीय सह संचालक व सह संचालक (म.न.पा.ले.प.) कार्यालयातील सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी व लेखापरीक्षा अधिकारी यांनी स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषदा व महानगरपालिका) व संकीर्ण संस्थांकडील त्यांच्या सेवा कालावधीतील पुर्नविलोकन अहवालात समाविष्ट नसलेल्या लेखा आक्षेपांची (Non PRC Paras) पडताळणी करु नये. सदरचे लेखाआक्षेप अनुपालन पडताळणीसाठी अनुक्रमे संबंधित जिल्हा सहाय्यक संचालक, विभागीय सह संचालक व सह संचालक (म.न.पा.ले.प.) कार्यालयातील सहाय्यक संचालक यांचेकडे सादर करावेत.

२. जिल्हा सहाय्यक संचालक व विभागीय सह संचालक कार्यालयातील सहाय्यक संचालक तसेच सह संचालक (म.न.पा.ले.प.) कार्यालयातील सहाय्यक संचालक यांनी स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषदा व महानगरपालिका) व संकीर्ण संस्थांक्डील त्यांच्या सेवा कालावधीतील पुर्नविलोकन अहवालात समाविष्ट नसलेल्या लेखा आक्षेपांची (Non PRC Paras) पडताळणी करु नये. सदरचे लेखाआक्षेप अनुपालन पडताळणीसाठी अनुक्रमे संबंधित विभागीय सह संचालक व सह संचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचेकडे सादर करावेत.

३. विभागीय सह संचालक व सह संचालक (म.न.पा.ले.प.) यांनी स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषदा व महानगरपालिका) व संकीर्ण संस्थांक्डील त्यांच्या सेवा कालावधीतील पुर्नविलोकन अहवालात समाविष्ट नसलेल्या लेखा आक्षेपांची (Non PRC Paras) पडताळणी करु नये. सदरच्या लेखाआक्षेप अनुपालन पडताळणीबाबतचा प्रस्ताव संचालनालयास सादर करावा. सदरच्या लेखाआक्षेपांची अनुपालन पडताळणी संचालनालयाने आदेशित केलेल्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल.

सदर आदेशातील सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:- सर्व सह संचालक व जिल्हा सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांना पुढील कार्यवाहीस्तव.

D/aa२/jadhav/ asa /file no १८३/ ०२.०६.२०१७